**प्रेस नोट** दिनांक :- २४/०९/२०१८

पुणे शहरातील श्री गणेश विसर्जनाची मिरवणुक शांततेने व उत्साहाच्या वातावरणात पार पाडण्यास पुणेकरांनी पोलीस प्रशासनास केलेल्या सहकार्याबद्दल पुणे शहर पोलीस दल नागरिकांचे मनःपुर्वक आभारी आहे.

श्री गणेश विसर्जनाची ही मिरवणुक आज दिनांक २४/०९/२०१८ रोजी दुपारी ०१ वाजुन ०६ मिनिटानी समाप्त झाली. मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी दीड तास लवकर मिरवणुक संपली आहे. या मिरवणुकीकरिता पोलीस अधिकारी व कर्मचारी २८ तास कर्तव्यावर हजर होते.

श्री गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये ध्वनिप्रदुषण करणारे मंडळ/डीजे चालक यांचेविरुध्द एकुण ७५ प्रकरणांची नोंद करण्यात आली आहे. डीजे ध्वनीवर्धनकरिता वापरण्यात आलेले एकुण ५७ मिक्सर्स व इतर उपकरणे जप्त करण्यात आलेली आहेत. यामध्ये एकुण १२ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये ज्या मंडळाकडुन पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ व ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० यांचे उल्लंघन झालेले आहे, अशा सर्व प्रकरणांमध्ये **कायदेशीर कारवाई करण्यासाठी एक विशेष पथक** (Special Team ) नियुक्त करण्यात आले आहे.

श्री. गणेश विसर्जन मिरवणुकीतील **मोबाईल चोरीचे सदर्भात** गुन्हे शाखेकडुन **०८ व्यक्तिंना अटक** करण्यात आली असून त्यांचेविरुध्द जबरी चोरीचे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एकुण **७० मोबाईल्स जप्त** करण्यात आलेले आहेत. या व्यतिरिक्त फरासखाना पो.स्टे. येथे मोबाईल चोरीचे **१० गुन्हे दाखल असून त्यामध्ये ०६-व्यक्तिंना अटक** करण्यात आली आहे.

--००--

Scanned by CamScanner